डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

# कृषि महाविद्यालय, दापोली

## जिल्हा-रत्नागिरी

जा.क्र. कृमविदा/स.कृ.सं.प./भोजन/६५८५/२०२२ दिनांक: 25 NOV 2022

प्रति,

............................................

............................................

............................................

विषय : ५० वी संयुक्त कृषि संशोधन परिषद २०२२ करिता येणाऱ्या सर्व अभ्यगतांसाठी भोजनाचे दरपत्रक मागविण्याबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत दिनांक १४ डिसेंबर, २०२२ ते १६ डिसेंबर, २०२२ या काकलावधीत ५० व्या संयुक्त कृषि संशोधन समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. कृषि संशोधन समितीच्या बैठकीसाठी येणारे संशोधक, मा. निमंत्रित पाहुणे आणि शासकिय उच्च पदाधिकारी यांना बेड टी, नाश्ता, दुपारचे भोजन आणि रात्रीचे भोजन द्यावयाचे प्रस्तावीत आहे. तरी सदरील भोजन व्यवस्थेकरीता सोबत जोडलेल्या प्रपत्रातील तपशिला प्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

वरील भोजनाची दरपत्रके बंद लिफाफ्यात दिनांक ०६/१२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी टपालाने अथवा हातबटवडयाने मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली, ता. दापोली, जि. रत्नागिरी यांच्या नावे पोहचतील असे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच लिफाफ्यावर **"५० वी संयुक्त कृषि संशोधन परिषद २०२२ करिता भोजन दरपत्रक"** असे नमुद करण्यात यावे. तसेच दरपत्रकाच्या अटी व शर्ती व इतर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **www.dbskkv.org** व नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

आपला विश्वासू

अध्यक्ष
भोजन व्यवस्थापन समिती
तथा सहयोगी अधिष्ठाता
कृषि महाविद्यालय, दापोली

**सर्व साधारण अटी व शर्ती :–**

१. सदर दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदारांकडे अन्न व औषधे प्रशासनाचा परवाना (कॅटरींग) असेणे बंधनकारक आहे. असा परवाना नसणाऱ्या ठेकेदाराचे दरपत्रक रद्द करण्यात येईल.

२. सुरक्षा अनामत रक्कम रु. १००००/– (रुपये दहा हजार) मात्र धनाकर्षाव्दारे (डी.डी.) स्वीकारण्यात येईल. धनाकर्ष हा नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅंकेचा दापोली येथे देय असावा. दरपत्रका सोबत सुरक्षा अनामत रकमेचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

३. आदेशीत केलेले काम पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारची अगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.

४. भोजन समितीला आवश्यक वाटल्यास मेनू किंवा दर्जा बदलण्याचा हक्क राखून ठेवण्यात आला आहे. ठेकेदारास आपल्या मनाप्रमाणे कोणत्याही मेनूमध्ये बदल करता येणार नाही. त्याकरीता भोजन समितीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

५. भोजनगृहातील स्वच्छता, निटनेटकेपणा, भांडयांचा वापर इ. बाबीत ठेकेदार जबाबदार समजला जाईल.

६. भोजनगृहामध्ये बाहेरील कोणत्याही इसमास जेवण घेण्यास–देण्यास सक्त मनाई राहील, तसे आढळून आल्यास सबंधीत ठेकेदारास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

७. ठेकेदारास प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या नाश्ता व जेवणाच्या वेळा पाळणे बंधनकारक असेल.

८. भोजनासाठी वापरण्यात येणारे तेल, मसाले, कडधान्ये, तांदूळ, आटा इ. चांगल्या प्रतीचे असावे. त्याचप्रमाणे भोजनगृहामध्ये व भोजनामध्ये अस्वच्छता, अन्नभेसळ, विषबाधा या सारखा अनुचीत प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

९. भोजनगृहातील सापसफाई व सुरक्षतेतासाठी सर्व साहित्य ठेकेदारानेच आणावयाचे आहे. तसेच भोजनगृहातील खरखटे हे नेमुन दिलेल्या जागी ठेकेदाराने विल्लेवाट लावणे बंधनकारक आहे.

१०. ठेकेदारास बाहेरील कोणत्याही प्रकारचे तयार अन्न पदार्थ तयार करून भोजनगृहात आणता येणार नाहीत.

११. दरपत्रक स्वीकारल्यानंतर काही कारणास्तव प्रथम क्रमांकाचे स्वीकारलेले दरपत्रक रद्द करावयाचे झाल्यास दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास ठेका देण्यात येईल.

१२. एकापेक्षा जास्त पुरवठादारानी एकसारखे दर दिल्यास जेवण पुरवठयाचे आदेश कोणास द्यावे/विभागुन द्यावे व कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके कोणत्याही कारणस्तव नामंजूर करण्याबाबतचे सर्व हक्क अध्यक्ष, भोजन समिती यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१३. पिण्याचे पाणी म्हणून थंड व फिल्टरचे पाणी आवश्यक आहे. (जार)

सहयोगी अधिष्ठाता
कृषि महाविद्यालय, दापोली
जि.रत्नागिरी-४१५७१२

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

# कृषि महाविद्यालय, दापोली

## जिल्हा-रत्नागिरी

दिनांक :

## भोजन व्यवस्थेकरीता अर्ज

प्रति,

..........................................

..........................................

..........................................

विषय : ५० वी संयुक्त कृषि संशोधन परिषद २०२२ करिता येणाऱ्या सर्व अभ्यगतांसाठी भोजन व्यवस्था करणेबाबत....

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पूर्ण नाव | : | | | | |
| पूर्ण पत्ता | : | | | | |
| भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | | |
| पॅन कार्ड क्रमांक | : | | आधार क्रमांक | : | |
| परवाना क्रमांक व दिनांक | : | | | | |

सही

नाव : ..............................................

**टिप :** सोबत दिलेल्या प्रपत्रामधील प्रति दिन प्रति माणसी या रखान्यामध्ये आपले दर नमूद करावे.

## ५० वी संयुक्त कृषि संशोधन परिषद २०२२ करिता येणाऱ्या सर्व अभ्यागतांसाठी भोजन व्यवस्था

| दिनांक/वार | संभाव्य संख्या | बेड टी स. ६.०० वा. | सकाळ नाश्ता स. ८.०० ते ९.०० वा. | दुपारचे जेवण दु. १.०० ते २.३० वा. | संभाव्य संख्या | रात्रीचे जेवण रा. ८.०० ते १०.०० | प्रति दिन प्रति माणसी दर रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३/१२/२०२२ मंगळवार | — | — | — | — | २०० | वरण+भात+चपाती+फ्लॉवर बटाटा भाजी, लोणचे+पापड | |
| १४/१२/२०२२ बुधवार | ५०० | बेड टी | कांदापोहे+केळी ऑमलेट ब्रेड, जॅम+टोमॅटो स्वास चहा+कॉफी | व्हेज पुलाव+रायता कोशिंबीर+डबलबीन्स भाजी+बतव सॅलाड–कांदा+गाजर+बीट+काकडी भेंडी भाजी+पुरी+चपाती लोणचे+पापड, शेवया खीर सुगंधी मसाला ताक | ४०० | टोमॅटो सुप+जीरा राईस+सलाड, आमरस+डाळ तिखट, चवळी उसळ+ पालक पनिर, मच्छी करी, मच्छीफ्राय–बांगडा/ चिकन, पुरी, चपाती+ लोणचे+पापड सोलकडी + आयस्क्रिम | |
| १५/१२/२०२२ गुरूवार | ४०० | बेड टी | उपमा+केळी ब्रेड ऑम्लेट+टोमॅटो स्वास+जॅम, कुर्मा+पुरी चहा+कॉफी | साधा भात+बुंदी रायता सॅलाड– कांदा+बीट+गाजर+काकडी . राजमा उसळ+फ्लॉवर मटार चपाती+केळी शिकरण मुगडाळ आणि तुरडाळ वरण, आमरस, सुगंधी मसाला ताक | ४०० | व्हेज पुलाव, कोशिंबीर सलाड आमम्रखंड पुरी, चपाती चिकन मच्छी फ्राय पॉपलेट, सुरमई, कोळंबी तिखले, सोलकडी + आयस्क्रिम | |
| १६/१२/२०२२ शुक्रवार | ४०० | बेड टी | शिरा, उकडलेली अंडी+केळी, ब्रेड पॅटीस/वडा पाव, मेदुवडा सांबर,चहा,कॉफी | व्हेज पुलाव मटर पनीर भाजी मोड आलेली मटकी उसळ चपाती+पुरी, अंडाकरी, मच्छी फ्राय सॅलाड– तीखट आमटी, श्रीखंड, सुगंधी मसाला ताक | २०० | साधा भात, तिखट आमटी मच्छी करी बांगडा फ्राय पालक पनीर+कोबी लोणचे+पापड, सोलकडी | |

**चहा, दुपारचे जेवण आणि रात्रिचे जेवणासाठी आर. वो. फील्टर केलेले पाणी, पेपर नॅपकीन, सॅनिटायझर इ. व्यवस्था आवश्यक आहे.**

टीप : दर मागणीपत्रासाठी नमूद १ ते १३ अटी शर्ती मला मान्य असून वर नमूद केल्याप्रमाणे चारही दिवसांसाठी सरासरी प्रति दिन प्रति माणसी दर आहे. सोबत माझे ओळखपत्र आणि पूर्ण पत्ता, फोन नंबर, ई–मेल जोडण्यात आले आहे. तसेच सदरचे भोजन हे पोटभर अमर्यादीत आहे.

नाव :

स्थळ :

पत्ता :

दिनांक :

फोन नंबर :